नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १७२ Issue - 172 | वार मंगळवार दि. ११ नोव्हेंबर २०२५ Blow- Tuesday Date 11 November 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# देशाच्या राजधानीत लाल किल्ला परिसरात मोठा स्फोट, १३ जणांचा मृत्यू, दिल्लीसह मुंबईत हाय अलर्ट जारी

## ३० हून अधिक जण जखमी; परिसरातील अनेक घरे हादरली, पोलिस आणि विविध सुरक्षा यंत्रणाकडून तपास सुरु

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : दिल्लीच्या लाल किल्ला परिसरात मोठा स्फोट झाला आहे. या स्फोटात आतापर्यंत १३ जणांचा मृत्यू झाला आहे. लाल किल्ला मेट्रो स्टेशनच्या गेट नंबर एकच्या बाहेर पार्किंगमध्ये हा म ोठा स्फोट झाला आहे. हा स्फोट नेमका कशामुळे झालाय? ते अद्याप समजू शकलेलं नाही. पण पोलिसांनी आज फरीदाबादमध्ये मोठी कारवाई केल्यानंतर आज संध्याकाळी दिल्लीत स्फोट झाला आहे. त्यामुळे या घटनेमागे दहशतवाद्यांचा हात आहे का? ते अद्याप समजू शकलेलं नाही. एका इको व्हॅनमध्ये हा स्फोट झाला. दिल्ली लाल किल्ला मेट्रो स्टेशनच्या बाहेर संध्याकाळी ६ वाजून ५० मिनिटांनी ही स्फोटाची घटना घडली. स्फोटानंतर परिसरात मोठी आग लागली. या आगीत अनेक गाड्या आगीच्या भक्षस्थानी गेल्या. या स्फोटानंतर संपूर्ण दिल्लीसह मुंबईतही हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे.



हा स्फोट खूप भीषण होता. परिसरात गाड्यांचा चक्काचूर झाला आहे. घटनास्थळी गाड्यांचे केवळ सांगाडे उरले आहे. एवढंच नाही तर काही ठिकाणी मानवी शरीराचे अवयव अस्ताव्यस्थ पडलेली बघायला मिळत आहेत. या घटनेत आतापर्यंत १३ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळत आहे. पण हा आकडा वाढण्याची भीती वर्तवली जात आहे. या घटनेमागे नमकं कारण काय आहे? हा दहशतवादी हल्ला होता की दुसरं काही होतं? ते अद्याप समजू शकलेलं नाही. पोलीस, रुग्णवाहिका, अग्निशामक दल, बॉम्ब शोधक आणि नाशक पथक घटनास्थळी दाखल झाले आहेत. घटनास्थळी फॉरेन्सिक टीम देखील दाखल झाली आहे. घटनास्थळी डॉग स्कॉडच्या मदतीने तपास केला जात आहे.



२४ जण जखमी, नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण

या स्फोटात आतापर्यंत २४ जण जखमी झाले आहेत. जखमींना तातडीने एलएनजीपी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. हा स्फोट इतका मोठा होता की, त्याच्या आवाजाने परिसरातील दुकानांची काचे फुटली. तसेच अनेक वाहनांच्या देखील काचा फुटल्या होत्या. या स्फोटानंतर परिसरात एकच खळबळ उडाली. घटना पाहण्यासाठी बघ्यांनी मोठी गर्दी केली. घटनास्थळी मोठा गोंधळ उडालेला होता. अखेर घटनेची माहिती मिळताच अग्निशामक दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाले.


पोलिसांनी तातडीने परिस्थिवर नियंत्रण मिळवले. संबंधित परिसर पूर्णपणे निर्मनुष्य करण्यात आला. या घटनेनंतर नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण आहे. पोलिसांकडून कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नका, असं आवाहन करण्यात आलं आहे. हा स्फोट इतका भीषण होता की, परिसराती घरे देखील हादरले आहेत. आता पोलीस आणि विविध सुरक्षा यंत्रणांकडून तपास केला जात आहे.


# संपूर्ण दिल्लीसह मुंबईमध्ये हाय अलर्ट जारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : दिल्लीतील लाल किल्ला मेट्रो स्टेशनजवळ मोठा स्फोट झाला असून त्यामुळे दिल्ली हादरल्याचं दिसून आलं. त्यामध्ये आतापर्यंत अकरा जणांचा मृत्यू झाल्याची माहिती असून मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. दिल्लीतील या स्फोटानंतर संपूर्ण दिल्लीमध्ये हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. तसेच मुंबईसह देशा-तील प्रमुख शहरांमध्येही हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे.

दिल्लीतील लाल किल्ला मेट्रो स्टेशनच्या गेट नंबर एक जवळ पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या एका कारमध्ये हा स्फोट झाला.





सुरुवातीला हा सिलेंडरचा स्फोट असल्याचं काही जणांना वाटलं. पण त्यानंतर हा स्फोट गंभीर असल्याचं समोर आलं.

दिल्लीतील स्फोटानंतर मुंबईत हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. सर्व पोलिस ठाण्यांना सूचना देण्यात आल्या असून नाकाबंदी करण्यात आली आहे. संशयित व्यक्तींची यादृच्छिक झडती घेतली जाईल. तसेच ग्राऊंड इंटेलिजन्स नेटवर्क सक्रिय करण्यात आले आहे. संवेदनशील भागात गस्त वाढविण्याचे आदेशही देण्यात आले आहेत.

संपूर्ण परिसर रिकामा केला

ज्या ठिकाणी हा स्फोट झाला ते ठिकाण लाल किल्ल्यापासून फक्त ८०० मीटर अंतरावर आहे. त्यामुळे सुरक्षा यंत्रणांनी हा संपूर्ण परिसर रिकामा केला. या ठिकाणी अग्नीशमन दल पोहोचलं असून लागलेली आग आटोक्यात आणण्यासाठी ते प्रयत्न करत आहेत. तसेच या ठिकाणी एनएसजीचे वरिष्ठ अधिकारीही दाखल झाले आहेत. त्याचसोबत फॉरेन्सिक टीमही या ठिकाणी दाखल झाली असून ते पुरावे गोळा करण्याचं काम करत आहेत.

काही दहशतवाद्यांना अटक

गेल्या चार दिवसात, म्हणजे ७ नोव्हेंबर ते १० नोव्हेंबर या दरम्यान दिल्लीमध्ये काही दहशतवाद्यांना अटक करण्यात आली आहे. त्यामुळे दिल्लीमध्ये झालेल्या या स्फोटाकडे गांभीर्याने पाहिलं जात आहे. दिल्लीमध्ये झालेल्या या स्फोटानंतर संपूर्ण दिल्लीमध्य हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. त्याचसोबत आर्थिक राजधानी मुंबईमध्येही हाय अलर्ट जारी करण्यात आलं आहे.

# अमित शाह यांनी घेतली दिल्ली स्फोटाची माहिती, आयबी चीफसोबत केंद्रीय गृहमंत्र्यांची चर्चा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




नवी दिल्ली : देशाची राजधानी दिल्ली आज स्फोटाच्या घटनेने हादरली आहे. दिल्लीतील अत्यंत ऐतिहासिक अशा लाल किल्ला परिसरात मोठा स्फोट झाला आहे. लाल किल्ला मेट्रो स्टेशनच्या गेट नंबर एकच्या बाहेर हा स्फोट झाला. सुरुवातीला हा स्फोट पार्किंगमधील वाहनात झाल्याची माहिती समोर येत होती. पण आता नुकत्याच पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सिग्नलवर एक गाडी आली. त्या गाडीत काही प्रवासी होते. ही गाडी सिग्नलवर थांबल्यानंतर या गाडीत मोठा स्फोट झाला, अशी प्राथमिक माहिती दिल्ली पोलिसांनी दिली आहे. दिल्ली पोलीस या प्रकरणी सविस्तर तपास करत आहेत. ही घटना अत्यंत भीषण आहे. या घटनेत आतापर्यंत १० जणांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळत आहे. तर ३० जण जखमी झाल्याची माहिती आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी या घटनेची गंभीर दखल घेतल्याची माहिती आहे.

घटनेनंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आयबी चीफसोबत चर्चा केल्याची माहिती आहे. या चर्चेत स्फोटाची माहिती घेण्यात आली आहे. तसेच या स्फोटाचं वृत्त समोर आल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना फोन केल्याची माहिती आहे. ही घटना नेमकी कशामुळे घडली? ते अद्याप समजू शकलेलं नाही. पण ही घटना कशी घडली ते पोलिसांनी स्पष्ट केलं आहे. एक इको कार हळूहळू सिग्नलजवळ आली. त्या गाडीत प्रवासी होते. कार सिग्नलजवळ थांबल्यानंतर लगेच स्फोट झाला, अशी माहिती दिल्ली पोलिसांनी दिली आहे. या प्रकरणातील सर्वात महत्त्वा-ची अपडेट म्हणजे पोलिसांनी या घटनेनंतर एका संशयिताला ताब्यात घेतलं आहे. पोलीस त्याची कसून चौकशी करत आहेत. दरम्यान, घटनास्थळाचा परिसर खाली करण्यात आला आहे. पोलीस, विविध तपास यंत्रणांकडून घटनास्थळी तपास केला जातोय.


पोलिसांनी आज सकाळीच फरीदाबाद येथे मोठी कारवाई केली होती. पोलिसांनी फरीदाबाद येथून स्फोटकं जप्त केले होते. त्यानंतर आज संध्याकाळी ६ वाजून ५२ मिनिटांनी लाल किल्ला परिसरात मोठा स्फोट झाला. या परिसरात नेहमी प्रचंड रहदारी असते. त्यामुळे हा अपघात होता की घातपात होता? असा प्रश्न आता उपस्थित होतोय. पोलीस आणि सुरक्षा यंत्रणा या प्रकरणी सविस्तर तपास करत आहेत.

## दहशतवादी हल्लाच असल्याचे स्पष्ट

# दिल्ली स्फोटामध्ये वापरलेल्या कारचा मूळ मालक सलमान, फरिदाबाद कनेक्शन समोर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : नवी दिल्लीतील लाल किल्ला मेट्रो स्टेशनजवळ झालेल्या स्फोट प्रकरणी मोठी माहिती समोर आली आहे. या प्रकरणात हरियाणातील गुरुग्राम पोलिसांनी मोहम्मद सलमान नावाच्या व्यक्तीला ताब्यात घेतलं आहे. दिल्लीमध्ये ज्या ळ२० कारचा स्फोट झाला ती कार या मोहम्मद सलमानच्या नावावर रजिस्टर असल्याची माहिती समोर आली. त्याचवेळी ही कार त्याने दुसऱ्याच व्यक्तीला विकल्याचंही समोर आलं आहे.



दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ असलेल्या मेट्रो स्टेशनजळ सोमवारी सायंकाळी पावणे सातच्या सुमारास मोठा स्फोट झाला. त्याम ध्ये नऊ जणांचा मृत्यू झाला आहे. सुरुवा-तीला हा स्फोट सिलेंडरचा असल्याची चर्चा सुरू होती. मात्र नंतर यामागे काही घा-तपात असल्याचा संशय बळावला. त्यानंतर सुरक्षा यंत्रणांनी तपास सुरू केला. आता या स्फोटाचा आणि फरिदाबादच्या कारवाईचे कनेक्शन असल्याचंही समोर येत आहे.

गाडीच्या मूळ मालकाला अटक

दिल्लीमधील स्फोटामध्ये ज्या ळ२० कारचा वापर करण्यात आला ती कार हरियाणातील मोहम्मद सलमान नावाच्या व्यक्तीच्या नावावर रजिस्टर असल्याची माहिती समोर आली. त्यानंतर गुरुग्राम पोलिसांनी मोहम्मद सलमानला अटक केली. मात्र त्यानंतर पोलिसांना वेगळीच माहिती मिळाली.

मोहम्मद सलमानने त्याची ळ२० कार ही नदीम नावाच्या एका व्यक्तीला विकल्याची माहिती पोलिसांना मिळाली. हा व्यवहार ओखला या ठिकाणी झाला होता. त्यामुळे पोलीस आता त्या नदीम नावाच्या व्यक्तीचा शोध घेत आहेत.

दहशतवादी स्फोट असल्याचं स्पष्ट

या स्फोटामागील सर्व शक्यता तपासून पाहण्यात येत आहेत अशी माहिती केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांनी दिली. लाल किल्ला मेट्रो स्टेशन परिसरात ही कार येऊन थांबली आणि त्याचा स्फोट झाल्याची माहिती समोर येत आहे. तसेच याचे कनेक्शन फरिदाबाद म धील कारवाईशी असल्याचं समोर येत आहे. त्यामुळे दिल्लीतील स्फोट हा दहशतवादी हल्ला असल्याचं स्पष्ट होत आहे.

फरिदाबादमध्ये सात दहशतवाद्यांना अटक

दिल्लीतील स्फोटामुळे आज सकाळीच फरीदाबादमध्ये झालेल्या कारवाईची चर्चा सुरू झाली आहे. सोमवारी सकाळी फरीदाबाद मेडिकल कॉलेजमधून मोठा शस्त्रसाठा जप्त करण्यात आला आहे. दोन डॉक्टरांसह सात दहशतवाद्यांना अटक करण्यात आलीय. तसंच ३५० किलो स्फोटकही जप्त करण्यात आले आहेत. फरीदाबाद मेडिकल कॉलेज दिल्लीतील स्फोटाच्या स्थळापासून अवघ्या तासाभराच्या अंतरावर आहे.

जिल्हा परिषद व नगरपालिका निवडणूक




प्रचार साहित्य

अत्याधुनिक निवडणूक मोबाईल ॲप वापरा व हमखास निवडून या.

फक्त आमच्या कडेच



मतदार स्लिप नांव व मतदान केंद्रासहीत फक्त आमच्याकडेच मिळतील.

प्रचार साहित्य
१. डमी वोटिंग मशिन
२. झेंडे, टोपी,पंचा ३. बिल्ले
४. मतदार स्लिप ५.स्टिकर ६.पॉम्प्लेटस
७. स्लिप प्रिंटर ८. सॉफ्टवेअर
९. बॅचेस १०. एस.एम.एस./व्हाईस कॉल

नितीन कन्सलटन्सी
नितीन हलसगी
मो. 9595427070 / 9270325070

दैनिक
यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### भ्याड हल्ला

दिल्लीच्या लाल किल्ला परिसरात मोठा स्फोट झाला आहे. या स्फोटात आतापर्यंत १३ जणांचा मृत्यू झाला आहे. लाल किल्ला मेट्रो स्टेशनच्या गेट नंबर एकच्या बाहेर पार्किंगमध्ये हा मोठा स्फोट झाला आहे. झालेल्या स्फोट प्रकरणी मोठी माहिती समोर आली आहे. या प्रकरणात हरियाणातील गुरुग्राम पोलिसांनी मोहम्मद सलमान नावाच्या व्यक्तीला ताब्यात घेतलं आहे. दिल्लीमध्ये ज्या कारचा स्फोट झाला ती कार या मोहम्मद सलमानच्या नावावर रजिस्टर असल्याची माहिती समोर आली. त्याचवेळी ही कार त्याने दुसऱ्याच व्यक्तीला विकल्याचंही समोर आलं आहे. दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ असलेल्या मेट्रो स्टेशनजळ सोमवारी सायंकाळी पावणे सातच्या सुमारास मोठा स्फोट झाला. त्यामध्ये नऊ जणांचा मृत्यू झाला आहे. सुरुवातीला हा स्फोट सिलेंडरचा असल्याची चर्चा सुरू होती. मात्र नंतर यामागे काही घातपात असल्याचा संशय बळावला. त्यानंतर सुरक्षा यंत्रणांनी तपास सुरू केला. आता या स्फोटाचा आणि फरिदाबादच्या कारवाईचे कनेक्शन असल्याचंही समोर येत आहे. दिल्लीमधील स्फोटामध्ये ज्या कारचा वापर करण्यात आला ती कार हरियाणातील मोहम्मद सलमान नावाच्या व्यक्तीच्या नावावर रजिस्टर असल्याची माहिती समोर आली. त्यानंतर गुरुग्राम पोलिसांनी मोहम्मद सलमानला अटक केली. मात्र त्यानंतर पोलिसांना वेगळीच माहिती मिळाली. मोहम्मद सलमानने त्याची कार ही नदीम नावाच्या एका व्यक्तीला विकल्याची माहिती पोलिसांना मिळाली. हा व्यवहार ओखला या ठिकाणी झाला होता. त्यामुळे पोलीस आता त्या नदीम नावाच्या व्यक्तीचा शोध घेत आहेत. या स्फोटामागील सर्व शक्यता तपासून पाहण्यात येत आहेत अशी माहिती केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांनी दिली. लाल किल्ला मेट्रो स्टेशन परिसरात ही कार येऊन थांबली आणि त्याचा स्फोट झाल्याची माहिती समोर येत आहे. तसेच याचे कनेक्शन फरिदाबाद मधील कारवाईशी असल्याचं समोर येत आहे. त्यामुळे दिल्लीतील स्फोट हा दहशतवादी हल्ला असल्याचं स्पष्ट होत आहे.

# सिंदखेड राजा नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ चे बिगुल वाजले

## मा. राज्य निवडणूक आयोगाने नगर परिषद निवडणूक २०२५ करिता निवडणूक कार्यक्रम घोषित; ४ नोव्हेंबर २०२५ पासून आदर्श आचारसंहिता लागू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : मा. निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे यांच्या अध्यक्षतेखाली नाम निर्देशन पत्र स्वीकारणे व त्या अनुषंगिक कामकाजाबाबत आज दिनांक १० नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता नगरपरिषद कार्यालय सिंदखेडराजा येथे सभा आयोजित करण्यात आली होती.

सदर सभेमध्ये मा. निवडणूक निर्णय अधिकारी प्रा. संजय खडसे यांनी पुढील प्रमाणे सूचना दिल्या आहेत,

■ प्राप्त नाम निर्देशन पत्रांची तपासणी नियमानुसार आणि तपासणी सूची नुसार करण्यात यावी.

■ नामनिर्देशनाबाबत विहित मुदतीत ऑनलाईन प्रक्रिया पार पाडावी, अर्ज प्रक्रिया ही ऑनलाईन असल्याने अर्ज व्यवस्थित तपासून घेण्यात यावा.




■ उमेदवारांची अनामत रक्कम जमा करून घेणे व लेखा अद्यावत करणे बाबत विशेष सूचना देण्यात आल्या.

■ मा. निवडणूक आयोगाला सादर करावयाची माहिती तात्काळ सादर करावी.

■ अर्जाबाबत दैनंदिन अहवाल सादर करावा.

■ उमेदवारांना मा. निवडणूक आयोगाने दिलेल्या सूचना अवगत करून द्याव्यात.

■ नामनिर्देशन अर्ज बाबतची दैनंदिन स्थिती सूचना फलकावर प्रसिद्ध करावी.

■ आरक्षणाची अधिसूचनेनुसार कार्यवाही करावी.

■ मा.निवडणूक आयोगाने दिलेल्या चिन्हांच्या यादीनुसार कार्यवाही करावी.

■ मा. निवडणूक आयोगाने दिलेल्या मतदार यादीनुसारच नामनिर्देशनाची प्रक्रिया पार पाडावी.

■ उमेदवारांचे वय हे उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवसांपर्यंत २१ वर्षे पूर्ण असायलाच हवे हे तपासून घ्यावे.

■ प्रत्येक प्रभागांमध्ये दोन मतदान केंद्र आहेत व एका प्रभागांमध्ये तीन मतदान केंद्र आहेत.

■ उमेदवाराने कोणत्या प्रवर्गातून अर्ज भरला आहे याची खात्री करावी.

■ जर एखाद्या उमेदवारांनी आरक्षणातून अर्ज सादर केला असेल तर जात वैधता प्रमाणपत्र तपासणी आवश्यक आहे.

■ उमेदवारांकडून चिन्हाबाबत घोषणापत्र लिहून घ्यावे.

■ मान्यताप्राप्त पक्षांना त्यांचे निवडणूक चिन्ह देण्यात यावे.

■ /इ फॉर्म बाबत नस्ती ठेवावी, फॉर्म घेताना ठज किंवा ठज ची स्वाक्षरी घेणे आवश्यक आहे.

■ अर्जासोबत शपथपत्राची नोटरी केली आहे की नाही याची खात्री करून घ्यावी.

अशाप्रकारच्या सूचना मा. निवडणूक निर्णय अधिकारी प्रा. संजय खडसे यांच्याकडून देण्यात आल्या. सदर सभेसाठी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा मुख्याधिकारी डॉ.आशिष बोबडे, नायब तहसीलदार डॉक्टर प्रवीण कुमार वराडे तसेच सर्व निवडणूक अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

सदर निवडणुकीच्या अनुषंगाने दि.१०/११/२०२५ पासून उमेदवारांचे नामनिर्देशन पत्र प्राप्त करून घ्यायला सुरुवात झाली आहे, आजपासून नाम निर्देशन पत्र नगर परिषद कार्यालयात विक्री साठी उपलब्ध करण्यात आले आहेत.

निवडणूक उमेदवारांचे नामनिर्देशन पत्र हे मा. निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या नगर परिषद कार्यालय येथील दालनामध्ये नामनिर्देशन पत्र स्वीकृती सुरु आहे , आज दि. १०/११/२०२५ पर्यंत सिंदखेडराजा नगर परिषद सदस्य आणि नगराध्यक्ष पदासाठी एकही नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले नाही.

आज एकूण २४ व्यक्तींनी एकूण ३८ नामांकन नामनिर्देशन पत्र घेतले असून, एकूण ४० लोकांनी मतदान याद्या घेतल्या आहेत.

# मुलांना हवे मानसिक स्वातंत्र्य !; महिला व बालविकास विभाग आणि युनिसेफ बालकांच्या शारीरिक आरोग्याबरोबर जपतंय मानसिक आरोग्यही !

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

महिला व बालविकास विभाग आणि युनिसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने बालकांच्या मानसिक, शारीरिक आणि कौटुंबिक आरोग्याची काळजी घेण्यासाठी राज्यातील अंगणवाड्यामंध्ये पालक मेळावा आयोजित करण्यात येतो. याचा सकारात्मक परिणाम होताना दिसतो. आरंभ या कार्यक्रमाच्या तीन मुख्य व्यासपीठांपैकी एक म्हणजे पालक मेळावा. घरभेटी आणि मातामंडळ बैठकांबरोबरच पालक मेळाव्याचा उद्देश म्हणजे संपूर्ण समुदायाने एकत्र शिकणे आणि मुलांच्या संगोपनाबद्दल आई बरोबर वडील आणि कुटुंबातील सदस्यांनी जागरूक होणे आवश्यक आहे. महिला व बालविकास विभागामार्फत महिला व बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध योजना राबवल्या जातात. याप्रमाणे युनिसेफ ही संयुक्त राष्ट्रसंघाची एक संस्था आहे जी मुले आणि मातांची कल्याणासाठी काम करते. तिचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे, जगभरातील मुलांना अन्न, आरोग्य सेवा, शिक्षण आणि संरक्षण उपलब्ध करून देणे, आपत्ती, युद्ध किंवा दारिद्र्यग्रस्त भागातील मुलांना मदत करणे, लसीकरण, स्वच्छ पाणी आणि शिक्षणाच्या कार्यक्रमांद्वारे मुलांचे जीवन सुधारणे यासाठी १९४६ साली दुसऱ्या महायुद्धानंतर युद्धग्रस्त देशांतील मुलांना मदत करण्यासाठी ही संस्था स्थापन करण्यात आली.

लहान मुलांना खेळ, संवाद आणि सुरक्षित वातावरणापासून ते त्यांच्या आहारापर्यंत माहिती सांगणारे स्टॉल्स, खेळणी, शारीरिक, बौद्धिक, भावनिक आणि सामाजिक विकासासाठी आवश्यक असलेल्या गोष्टींबद्दल माहिती देण्याचे काम अंगणवाडी कर्मचारी, आरोग्य, आशा ताई करत आहेत. प्रत्येक बालकाच्या उत्तम वाढीसाठी पहिले हजार दिवस सुवर्णमयी असतात. त्यात पालक, घरातील सदस्याचा सहभाग अत्यावश्यक असतो. त्यामुळे पालकांशी मनमोकळा संवाद साधण्यासाठी महिला व बालविकास विभाग युनिसेफच्या समन्वयाने आईबरोबर वडिलांनीही बालकाला सांभाळण्याची जबाबदारी घ्यावी याचबरोबर घरातील सदस्यांचीही तेवढीच जबाबदारी असल्याचे प्रबोधन या पालक मेळाव्याच्या माध्यमातून करण्यात येते.

अनेकदा मी मुलांना काहीही करण्यापासून रोखते, त्यांना ओरडते. त्यामुळे मुले तात्पुरती गप्प बसतात. पण पालक मेळाव्याच्या माध्यमातून हे समजले की मुलांना कायम नकारात्मक प्रतिक्रिया देऊन त्यांच्या वाढीवर परिणाम होतो. त्यांना त्यांच्या पद्धतीने गोष्टी करू दिल्या तर त्यांची बौद्धिक वाढ उत्तम होते. अशी प्रतिक्रिया अंगणवाडीमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकाने दिली.



अंगणवाड्यांचे समूह एकत्रित करून त्यांच्या पालकांना मेळाव्याच्या माध्यमातून एकत्र करण्यात येते. या मेळाव्याच्या माध्यमातून मुलांच्या विकासात सुधारणा, कुटुंब आणि समुदाय सशक्त करणे, बाल संगोपनाबद्दल समुदाय जागरूकता वाढवणे, अंगणवाडी आणि आशा ताईंची भूमिका अधिक बळकट करणे, समग्र बालकांच्या काळजीबाबत दृष्टीकोन तयार करणे, समुदायाचा सहभाग आणि आत्मविश्वास वाढविणे, सातत्याने टिकणाऱ्या बालकांच्या पद्धतींचा प्रसार करण्याचे काम करण्यात येते. या मेळाव्यात दोन वर्षे वयोगटापर्यंत मुलांसाठी वयोगटानुसार खेळणी आणि शैक्षणिक साहित्य दाखवले जाते, दोऱ्यांचे जुने पुंजके, साबणाचे बॉक्स, कागदी डबे या वापरलेल्या वस्तूंपासून तयार केलेल्या खेळांच्या माध्यमातून मुलांच्या पाचही इंद्रियांचा विकास करणे हा उद्देश होय. दोऱ्यांचे वापरलेले रिळ, टाकून दिलेली झाकणे, पुठ्ठा, बांगड्या, साबणाचे रिकामे कागदी डब्बे यापासून बनवलेली तोरणं, माळा, रंगीत खेळणी मुलांना मेळाव्यात खिळवून ठेवतात. खेळणाऱ्या मुलांबरोबर त्यांची आई आणि इतर पालकांचाही समावेश होतो. काही खेळ हे पालकांसाठी असतात.

या मेळाव्याच्या माध्यमातून बालकांशी संवाद साधण्यासाठी विविध उपक्रम राबविले जातात. मुलांना विविध मुखवटे व टोपी घालून त्यांना आरशासमोर उभे केले जाते. जेणेकरून त्यांना स्वत:चा चेहरा पाहता येतो. अशा विविध उपक्रमाच्या माध्यमातून संवाद वाढवणे, मेंदूचा विकास, सामाजिक आणि भावनिक वाढ होण्यास मदत होते. याचबरोबर ब्रेन वायरिंग खेळाच्या माध्यमातून खेळ अनुभव आणि संवेदनाच्या आधारे मेंदूच्या न्यूरल कनेक्शनच्या निर्मितीचे महत्त्व समजावतो. मुलाचा मेंदू पहिल्या १००० दिवसात सर्वाधिक वाढते म्हणून या काळात स्पर्श, संवाद आणि खेळ यावर भर दिला जातो. पालक मेळाव्यात मुलांसाठी बाहूली घर तयार केले जाते. यामध्ये कल्पनाशक्तीचा वापर करून खेळ खेळवले जातात. यामुळे त्यांच्या सामाजिक, भावनिक आणि बौद्धिक विकासाला चालना मिळते. पौष्टिक पोषण अंतर्गत सहा महिन्यांपर्यंत आणि त्यानंतरचे अन्न कसे असावे हे दाखवले जाते. तसेच जंक फुडचे दुष्परिणाम आणि स्थानिक फळभाज्यांचा उपयोग सांगितला जातो.

याचबरोबर आरोग्याची जनजागृती कार्यक्रमात लसीकरणाचे वेळापत्रक, स्वच्छता, आयर्न-फॉलिक सिडचे महत्व, निमिया प्रतिबंध इत्यादी माहिती वैद्यकीय अधिकारी, आशा वर्कर यांच्यामार्फत करण्यात येते.

पालक हेच मुलांचे पहिले शिक्षक असतात, तीन वर्षांच्या वयातील विकास हा आयुष्यभरासाठीचा पाया घालतो. मुलांशी संवाद, प्रेम आणि संधी दिल्यास त्यांचा मेंदू, लक्ष आणि स्मरणशक्ती जलद वाढते. प्रोत्साहन हेच सर्वांत मोठे शिक्षण आहे.

**– श्रद्धा मेश्राम,**
**विभागीय संपर्क अधिकारी,**
**माहिती व जनसंपर्क**
**महासंचालनालय, मंत्रालय**

## नाविन्यपूर्ण कल्पना असणाऱ्या प्रत्येकाला नवउद्योजक बनण्याची संधी : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

# महाराष्ट्र हे भारताचे खरे 'स्टार्टअप कॅपिटल'

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई, : भारतातील सर्वाधिक नोंदणीकृत स्टार्टअप्स महाराष्ट्रात असून यातील ४५ टक्के स्टार्टअप्स महिलांच्या नेतृत्वाखाली आहेत, ही अभिमानाची बाब आहे. महाराष्ट्र हे देशाचे खरे 'स्टार्टअप कॅपिटल' असल्याचे सांगून भारताच्या पाच ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनण्याच्या उद्दिष्टात महाराष्ट्राचा आणि त्यातही महिला उद्योजकांचा मोठा वाटा असेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. त्याचबरोबर तरुणांच्या मनातील प्रत्येक कल्पना ही नाविन्यता असून स्टार्टअप्सच्या या काळात प्रत्येक व्यक्तीला नवउद्योजक बनण्याची संधी असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या 'इनोव्हेशन महाकुंभ २०२५' चे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते जुहू येथील विद्यापीठ परिसरात झाले. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. महिला शिक्षणाचे महत्त्व जाणून महिलांसाठी स्वतंत्र विद्यापीठ सुरू करणाऱ्या भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या पुण्यतिथीनिमित्त विद्यापीठामार्फत केंद्रीय शिक्षण मंत्रालय आणि राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या सहकाऱ्याने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, कौशल्य विकास विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा वर्मा, केंद्रीय शिक्षण मंत्रालयाचे संयुक्त सचिव आर्मस्ट्राँग पामे, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, एसएनडीटी विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा.डॉ.उज्वला चक्रदेव, 'नॅक'चे अध्यक्ष प्रा.अनिल सहस्त्रबुद्धे आदी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, ब्रिटनमध्ये महिलांना मतदानाचा अधिकार नव्हता, त्या काळात भारतरत्न महर्षी कर्वे यांनी १९१६ मध्ये महिलांसाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापन केले. त्यांच्या दूरदृष्टीमुळेच आज आपण महिला सक्षमीकरण आणि नवकल्पनांच्या नव्या युगात प्रवेश केला आहे. राज्य शासनाने नवउद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी धोरण तयार केले आहे. तरुणांच्या स्वप्नांना पंख देण्याची सरकार आणि विद्यापीठांची भूमिका असून राज्य शासन प्रत्येक टप्प्यावर नवउद्योजकांना साहाय्य करीत आहे.

मुख्यमंत्री म्हणाले, आज नवकल्पनेतून केवळ नवे उत्पादन नव्हे, तर जीवन अधिक सुलभ केले जात आहे. एखादी कल्पना जेव्हा बाजारपेठेत रूपांतरित होते, तेव्हा ती अर्थव्यवस्थेला गती देते. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डेटा नालिटिक्समुळे आता नव्या कल्पनांना वेग मिळत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या 'स्टार्टअप इंडिया' उपक्रमामुळे आज भारत जगातील तिसऱ्या क्रमांकाची स्टार्टअप इकॉनॉमी बनला असून लवकरच दुसऱ्या क्रमांकावर पोहोचेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमात महिला उद्योजकांनी विकसित केलेल्या नवकल्पनांचे प्रदर्शन मांडण्यात आले आहे. मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी प्रदर्शनाची पाहणी करून सर्व नवोन्मेषकांचे अभिनंदन केले. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते यावेळी वैद्यकीय, कृषी आणि वाहतूक व्यवस्थापन क्षेत्रातील उत्कृष्ट तीन स्टार्टअप कल्पनांचा सत्कार करण्यात आला. तसेच प्री इन्क्युबेशन सेंटरचे उद्घाटन करण्यात आले.




कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी राज्यात शिक्षण आणि नाविन्यता क्षेत्रात वेगाने काम होत असल्याचे सांगून येणाऱ्या काळात महाराष्ट्र या क्षेत्रात प्रथम क्रमांकावर असेल, असा विश्वास व्यक्त केला. शिक्षण आणि नाविन्यता क्षेत्रात महिलांच्या महत्त्वपूर्ण योगदानाचा उल्लेख करून शासन एसएनडीटी विद्यापीठाच्या पाठीशी असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा.डॉ. उज्वला चक्रदेव यांनी प्रास्ताविकाद्वारे 'इनोव्हेशन महाकुंभ २०२५' बाबत माहिती दिली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# आर्थिक तुल्यबळावर राजकारण करणाऱ्यांनो जनतेला मूर्ख समजलात का?

## औसा तालुक्यात अनेकांच्या गुडघ्याला बाशिंग; भावी जिल्हा, परीषद. पंचायत समिती सदस्यांना पैशाच्या जीवावर निवडून येण्याचे लागले डोहाळे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधि/अमर जाधव : आगामी जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्व भूमीवर गावोगावी , शहरा शहरात भावी जिल्हापरिषद सदस्य म्हणून काहीना भावी जिल्हा परीषद सदस्य व पंचायत समिती सदस्यत्वाचे डोहाळे लागल्याचे चित्र सध्या औसा तालुक्यात पहावयास मिळत आहे. चौका चौकात मले मोठ मोठे होल्डिंग लावून, पैशाचा माज दाखवत मी अर्थीक बाजुने सक्षम असल्याच भासवत जणू काय जनता आपल्या खिश्यात असल्या सारखा आत्मविश्वास मनात घेऊन फुशारकी मारणारे अवैध्य मार्गाने पैसे कमावनार्यांना आता जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यत्वाचे डोहाळे लागल्याचे दिसुन येत आहे ,व कुटलही कर्तत्व नसताना असे अनेक कार्यकर्ते मलाच उमेदवारी मीळणार मनत मतदार संघातील गावोगावी फिरू लागले आहेत.तर कधी कुणाच्या लग्न कार्यात न जाणारे, लोकांच्या सुख दुःखात सामील न होणारे अचानक गावोगावी फिरू लागल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

परंतू जनता कोणाची गुलाम नाही ज्याची त्याची जागा ज्याला त्याला दाखवण्यास समर्थ असून ते दाखवण्याचं काम जनता नक्कीच करेल. आपण किती खोल पाण्यात आहोत त्याचे आत्मपरीक्षण करण्यास जनता नक्कीच भाग पाडेल हे मात्र नक्की असून पैशाचा माज या निवडणुकीत उतरवला जाईल हे मात्र नक्की दिसत आहे. पैशाच्या जोरावर आपण निवडणून येऊ अशा आविर्भावात काही भावी उमेदवार सध्या गावोगावी फिरू लागले आहेत. पैशाने सर्वकाही विकत घेता येते या खोट्या आत्मविश्वासाच्या जोरावर काही जन वावरताना सध्या तरी काही भावी जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य गुडघ्याला बाशिंग बांधुन औसा तालुक्यात दिसून येत आहेत. परतू वेळ प्रसगी जनता त्याची जागा त्यांना नक्कीच दाखवून देईल हेही तितकेच खरे आहे.



# कालभैरव जयंती निफाडला धार्मिक व ग्रामअभियान कार्यक्रमाचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : बुधवार दिनांक १२ नोव्हेंबर रोजी कालभैरव जयंती निमित्त निफाड येथील येथील श्री स्वामी समर्थ सेवा व अध्यात्मिक विकास केंद्राच्या वतीने धार्मिक कार्यक्रम व ग्रामअभियान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती श्री स्वामी समर्थ सेवा व अध्यात्मिक विकास केंद्राचे प्रमुख वि.दा. व्यवहारे व केंद्र प्रतिनिधी ड जगदीश बागडे ,सुनील बागडे यांनी दिली.

निफाड येथील उपजिल्हा रुग्णालयाजवळील श्री शितला माता देवी व श्री कालभैरव मंदिरात सकाळी ९ ते १ यावेळेत होम हवन व धार्मिक कार्यक्रम व ग्रामअभियान कार्यक्रम संपन्न होणार आहे याप्रसंगी महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे.

या ग्राम अभियानांतर्गत सेवेकरी निफाड शहरात घरोघरी जाऊन व्यक्तिगत नागरिकांशी संवाद साधून कुलधर्म, कुलाचार, कुलदेवतेची ग्रामदेवतेची पूजा याविषयी माहिती देणार असून श्री शितला माता देवी व श्री कालभैरव मंदिरात आयोजित कार्यक्रमात अतिवृष्टीने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येणार असून त्यांचे समुपदेशन करण्यात येणार आहे.

याप्रसंगी सेविकऱ्यांनी उपस्थित रहावे व नागरिकांनी या अभियानाचा लाभ घ्यावा असे आवाहन वि.दा व्यवहारे, अॅड जगदीश बागडे, सुनील बागडे यांनी केले आहे

# श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरास कार्तिकी यात्रेत ५ कोटी १८ लाखाचे उत्पन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर : कार्तिकी यात्रा कालावधीत वारकरी भाविकांनी श्री विठ्ठल- रुक्मिणी मातेच्या चरणी ५ कोटी १८ लाख रुपयांचे दान केले तसेच सोन्या चांदीचे दागिने अर्पण केले असून मंदिर समितीला लाडू प्रसाद, देणगी, भक्तनिवास, हुंडीपेटी, श्रींच्या चरणाजवळ आदी विविध देणग्यांच्या माध्यमातून उत्पन्न मिळाल्याची माहिती मंदिरे समितीचे लेखाधिकारी मुकेश अनेचा यांनी दिली.

कार्तिकी शुध्द ०१ (दिनांक २२ ऑक्टोंबर) ते कार्तिकी शुध्द १५ (दिनांक ०५ नोव्हेंबर) या कालावधीत भाविकांनी श्रींच्या चरणाजवळ ४८०८२८९ रुपये अर्पण, १२७१९५२० रुपये देणगी, ५४१६५०० रुपये लाडू प्रसाद विक्री, ७१५९९१० रुपये भक्तनिवास, १७७१५२२७ रुपये हुंडीपेटी, ५०००० रूपये पुजा तसेच ३३३६८७६ रुपये सोने-चांदी अर्पण, तसेच अगरबत्ती, चंदन खोड, चंदन पावडर, महावस्त्रे, फोटो, मोबाईल लॉकर आदी माध्यमातून ६७०९०६ रुपये इतके उत्पन्न प्राप्त झाले आहे.

मागील वर्षी श्रींच्या चरणाजवळ ४१४१३१४ रुपये अर्पण, ११६९९४७३ रुपये देणगी, ६०६४६२० रुपये लाडू प्रसाद विक्री, ४४४८५८१ रुपये भक्तनिवास, ७३५६१०४ रुपये हुंडीपेटी, १०७२६८१ रूपये पुजा तसेच ५०४०१५ रुपये सोने-चांदी अर्पण, तसेच अगरबत्ती, चंदन खोड, चंदन पावडर, महावस्त्रे, फोटो, मोबाईल लॉकर आदी माध्यमातून ४६०५३४ रुपये उत्पन्न प्राप्त झाले आहे.

सन २०२४ च्या कार्तिकी यात्रेत रू. ३५७४७३२२/- व या वर्षीच्या यात्रेत रू. ५१८७७२२८/- इतके उत्पन्न प्राप्त असून, मागील यात्रेच्या तुलनेत रू. १६१२९९०६/- इतकी वाढ झाल्याचे दिसून येत आहे. या मिळालेल्या दानातून श्री विठ्ठल रूक्मिणी मातेच्या दर्शनासाठी येणाऱ्या वारकरी भाविकांना पुरेसा प्रमाणात सोई सुविधा उपलब्ध करून देण्याचा मंदिर समितीचा प्रयत्न राहील असे प्र. व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत यांनी सांगीतले.

# लोह्यात प्रभाग क्र. (५) मधून निवडणूक लढवणार : शिवहार गालफाडे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लोहा/प्रतिनिधी : अनेक वर्षांपासून लोहा शहरातील सामाजिक कार्यकर्ते शिवहार गालफाडे हे समाजातील आनेक कुठल्याही विषयांवर कार्य करत आहे. प्रभाग क्रं ५ मधील इंदिरानगर मध्ये सामाजिक कार्यकर्ता म्हणून गोरगरिब जनतेच्या हाकेला धावून येणारे प्रत्येकांच्या सुखदुखात नेहमी सहभाग नोंदवत असणारे.एकमेव चेहरा सामाजिक कार्यकर्ता म्हणून आगळंवेगळं कार्य करत असताना दिसणारे.

शिवहार गालफाडे यांच्या या कार्याने समाजातील काही कार्यकर्ते व राजकीय नेत्यांची झोपेचे सोंग करून झोपणाऱ्यांची झोप उडाली आहे. असे हे प्रभाग क्र. ( ५ ) मधील खंबीर नेतृत्व म्हणून शिवहार गालफाडे यांची प्रशंशा मोठ्या प्रमाणात होत आहे.



प्रभाग क्र.(५) मधील असलेले खंबीर नेतृत्व म्हणजेच शिवहार गालफाडे यांची जोरदार चर्चेतून नामांकित होत आहे.

प्रभाग क्रं( ५ )चा चेहरा बदलायचा असेल तर सामान्य गोरगरीब जनतेचे काम पूर्ण करायचे असतील तर एक वेळेस शिवहार गालफाडे यांना मदत करा.

इंदिरानगर मधील काही नागरिकांनी माझ्याशी संवाद साधताना ते म्हणाले की आपल्या इंदिरानगर मधून स्थानिक चा आपलाच उमेदवार मतदारांनी निवडून द्यावा असे ते म्हणाले बोलता बोलता ते म्हणाले की जर तुम्ही थांबलात तर फार बरं होईल कारण इंदिरानगर सुधारित तरी होईल स्थानिक चा उमेदवार असला तर त्यांच्या हाताला धरून काम तर सांगता येईल इंदिरानगर मधील नागरिकांनी असे मत व्यक्त केले. इंदिरानगर मधील गोरगरीब सर्व सामान्य जनता यांना चांगलाच प्रतिसाद देत आहे.

# विभागीय स्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत एम आयटी ज्युनिअर कॉलेजच्या मुलींचे यश




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विभागीय स्तरावरील बॅडमिंटन स्पर्धा अहिल्यानगर जिल्हा क्रीडा संकुल, वाडिया पार्क येथील बॅडमिंटन हॉलमध्ये नुकत्याच संपन्न झाल्या.

या स्पर्धेत वाखरी, पंढरपूर येथील माईर्स एमआयटी विश्वशांती गुरुकुल ज्युनिअर कॉलेजच्या १९ वर्षाखालील मुलींच्या संघाने उल्लेखनीय कामगिरी करत तृतीय क्रमांक पटकावला. एमआयटी ज्युनिअर कॉलेजच्या संघात अनुष्का चाकूर, संजना बाड, श्रद्धा महाडिक, आर्या कुलकर्णी व ज्ञानेश्वरी फावडे या खेळाडूंचा समावेश होता.

यावेळी प्राचार्य डॉ. स्वप्नील शेठ, हेड मिस्ट्रेस शिबानी बॅनर्जी, क्रीडा शिक्षक प्रवीण पिसाळ यांनी संघातील खेळाडूंचे अभिनंदन केले व त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# जब्बार शेख उर्फ बंडू गुरुजी यांचा सेवापुर्ती सोहळा भिसे वाघोलीत साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुरुड/प्रतिनीधी : सुधाकर रणदिवे,भिसे वाघोली येथील सुपुत्र जब्बार बहादूर शेख ऊर्फ बंडू गुरुजी यांचा भगतसिंग विद्यालय वाघोली ता. लातूर येथे सेवानिवृत्ती सोहळा साजरा करण्यात आला. आपल्या आयुष्याची ३९ वर्षे त्यांनी विद्यालयात लिपीक या पदावर कार्यरत होते.

अत्यंत मन मिळावू, विद्यार्थी प्रिय असे बंडू गुरुजी यांच्या सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षक आमदार विक्रम बप्पा काळे हे उपस्थित होते. त्याच बरोबर प्रा.डॉ.कुसुम मोरे, प्रा.डॉ.संग्राम मोरे, ड.उदय गवारे, परिसरातील सर्व मुख्याध्यापक, संस्थेचे सचिव कॉ.बहादुर साहेब शेख, अध्यक्ष अॅड. इरफान शेख, भगतसिंग विद्यालय चे विद्यमान मु.अ.कदम सर व सर्व शिक्षक शिक्षीका शिक्षकेतर आजी माजी कर्मचारी, सेवक उपस्थित होते.

गावातील नागरीकात, योगिराज साखरे, रशिद पठाण, उपसरपंच संभाजी वायाळ, दिलदार पठाण, कय्युम सय्यद, विनायक पानखडे, समाधान गिरी, सायराबी मुंडे, रामदास गिरी, सुफी सय्यद शमशोद्दीन, बबन पानखडे, फ्रेंडस मंडप डेकोरेशन निजाम सय्यद, गव्हाणे गुरुजी, कणसे गुरुजी, शितोळे गुरुजी, पवार गुरुजी, सर्व गावकरी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्री सुर्यवंशी सर यांनी केले तर अध्यक्षीय समारोप कदम सरांनी केला. शेवटी बंडू गुरुजी यांनी सर्व उपस्थित व सत्कार करण्यासाठी आलेल्या सर्वांचे मनापासून आभार मानले स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

संकल्पना: 'थिंक हेल्थ, थिंक फार्मासिस्ट'

'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' या उपक्रमांतर्गत 'आरोग्य तपासणी शिबिर'

# स्वेरीज् कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये 'राष्ट्रीय फार्मासिस्ट दिवस २०२५' संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




पंढरपूर : 'फार्मासिस्ट हे केवळ औषधतज्ज्ञ नसून आरोग्यसेवा व्यवस्थेचे महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत. ज्यांचे कार्य औषध देण्यापुरतेच मर्यादित नसून रुग्णांमध्ये आरोग्याविषयी जनजागृती करून योग्य मार्गदर्शन करणे हा आहे. औषधांचा योग्य वापर, आरोग्य शिक्षण व जनजागृती या माध्यमातून ते समाजाचे आरोग्य सुधारतात. जागतिक आरोग्याच्या गरजा पूर्ण करण्यात फार्मासिस्टचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असून, त्यांचे समाजाच्या आरोग्यासंदर्भात असलेले काम हे प्रेरणादायी आहे.' असे प्रतिपादन स्वेरीचे सचिव डॉ. सूरज रोंगे यांनी केले.

गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ फार्मसी मध्ये 'थिंक हेल्थ, थिंक फार्मासिस्ट' या संकल्पनेतून 'राष्ट्रीय फार्मासिस्ट दिवस-२०२५' उत्साहात साजरा करण्यात आला. स्वेरीचे संस्थापक डॉ. बी. पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली व प्राचार्य डॉ. मिथुन मणियार यांच्या नेतृत्वाखाली दि. २४ सप्टेंबर ते २६ सप्टेंबर २०२५ या कालावधीत याचे आयोजन केले होते. २४ सप्टेंबर रोजी 'एन.एस एस. दिन' निमित्त महाविद्यालयाच्या भव्य वाचनालयात 'ऐच्छीक रक्तदान शिबिरा'चे आयोजन केले होते. वात्सल्य नेत्रालयाच्या नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. राखी मणियार यांच्या हस्ते या शिबिराचे उदघाटन करण्यात आले. यावेळी त्यांनी डोळ्यांच्या आरोग्याबाबत माहिती दिली तसेच 'दैनंदिन जीवनात डोळ्यांची काळजी कशी घ्यावी, योग्य आहार आणि जीवनशैलीद्वारे दृष्टी कशी निरोगी ठेवावी' याबाबत मार्गदर्शन केले. अक्षय ब्लड बँकच्या सहकार्याने पार पडलेल्या या शिबिरात विद्यार्थी व प्राध्यापक असे मिळून एकूण ४३ रक्तदात्यांनी ऐच्छिक रक्तदान केले. फार्मासिस्टचे योगदान ओळखणे आणि त्यांच्या कार्यास प्रोत्साहन देणे यासाठी प्रत्येक वर्षी दि. २५ सप्टेंबर रोजी 'जागतिक फार्मासिस्ट दिवस' साजरा केला जातो. 'जागतिक फार्मासिस्ट दिना'निमित्त सकाळच्या सत्रामध्ये स्वेरीज् कॉलेज ऑफ फार्मसी, पंढरपूर व पंढरपूर तालुका केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजिलेल्या 'भव्य आरोग्य रॅली'चे उदघाटन स्वेरीचे सचिव डॉ. सूरज रोंगे यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी पंढरपूर केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष प्रशांत खलिपे, सचिव महादेव जाधव, श्रीराम राहिरकर आणि माजी अध्यक्ष सतीश सादीगले यांनी मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. मिथुन मणियार, एन.एस.एस. विभाग प्रमुख प्रा. हेमंत बनसोडे यांच्यासह शिक्षकवृंद, विद्यार्थी व तालुक्यातील फार्मासिस्ट मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

यावेळी 'थिंक हेल्थ, थिंक फार्मासिस्ट' या विषयावर विद्यार्थ्यांनी लघुनाटिका सादर केली. दि.२६ सप्टेंबर रोजी 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' या उपक्रमांतर्गत 'आरोग्य तपासणी शिबिर' घेण्यात आले. यात सीबीसी, थायरॉईड, लिव्हर, किडनी, बीएसएल रँडम, एचबीएएलसी यांसह विविध तपासण्या करण्यात आल्या. याचे उदघाटन स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. स्नेहा रोंगे, डॉ. आशुतोष शेळके व डॉ. वैष्णवी खुर्द यांच्या हस्ते झाले. 'फार्मासिस्ट दिना'निमित्त मेहंदी, रेखाटन, बुद्धिबळ, कॅरम व रील मेकिंग अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. 'थिंक हेल्थ, थिंक फार्मासिस्ट' या संकल्पनेवर आधारित या 'सर्जनशील' स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. तसेच कॉलेज मध्ये विद्यार्थ्यांसाठी मेडिकल डिटेलिंग, फार्मस्यूटीकल मॉडेल प्रेझेंटेशन, पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन, ॲनिमेशन व्हिडिओ स्पर्धा, पोस्टर प्रेझेंटेशन, प्रश्नमंजुषा, वादविवाद स्पर्धा, रांगोळी आणि मेहंदी अशा विविध स्पर्धा तर क्रीडाप्रकारांमध्ये कॅरम आणि बुद्धिबळ या स्पर्धा देखील घेण्यात आल्या. याप्रसंगी प्राचार्य डॉ. एम. जी. मणियार म्हणाले की, 'यंदाची थीम 'थिंक हेल्थ, थिंक फार्मासिस्ट' ही फार्मासिस्टच्या समाजातील भूमिकेचे प्रतीक आहे. आरोग्य आणि फार्मासिस्ट हे समाजाचे अविभाज्य घटक आहेत. योग्य औषधोपचार, आरोग्यजागृती आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून फार्मासिस्ट समाजाच्या आरोग्यवर्धनात महत्त्वाची भूमिका बजावतो. ही संकल्पना आजच्या आरोग्यसेवेचा खरा पाया आहे.' असे सांगून औषधनिर्माण क्षेत्रातील अनुभव सांगितले. जागतिक फार्मासिस्ट दिनानिमित्ताने प्रमुख पाहुणे केंद्र शासनातील वरिष्ठ रेल्वे फार्मासिस्ट किरण कदम यांनी 'विद्यार्थ्यांना फार्मसी क्षेत्रातील विविध शासकीय परीक्षांची तयारी कशी करावी, येणाऱ्या अडचणी व त्यांचे नियोजन, याबद्दल महत्वपूर्ण माहिती देवून स्वेरीच्या आदर युक्त शिस्तीचे कौतुक केले. राष्ट्रीय फार्मसी सप्ताह अंतर्गत घेण्यात आलेल्या स्पर्धांच्या विजेत्या आणि उपविजेत्या स्पर्धकांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाप्रसंगी सांस्कृतिक कार्यक्रमाचे विभागप्रमुख प्रा. सुप्रज्ञा गायकवाड यांच्यासह इतर प्राध्यापक उपस्थित होते. यावेळी विविध कार्यक्रमांचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी गायत्री कापसे, लक्ष्मी दबडे, सानिका बाबर, स्वप्नाली घाडगे व दीक्षा झांबरे यांनी केले तर सुयश भोसले यांनी आभार मानले.

# नीट परीक्षेतील गोंधळाचा फटका भिवंडीतील विद्यार्थिनीला; दोन निकालाने विद्यार्थिनीसह पालक चिंताग्रस्त

## तक्रारीचे निवारण अद्यापही नाही; ऑल इंडिया रँकिंगमध्ये असणाऱ्या विद्यार्थिनीच्या भविष्याचा प्रश्न ऐरणीवर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : वैद्यकीय शिक्षा घेण्याचे स्वप्न देशभरातील लाखो विद्यार्थी बघत असतात.त्यासाठी शैक्षणिक अभ्यासासोबत नीट परीक्षेसाठी अनेक विद्यार्थी दिवसरात्र अभ्यासात गढून जातात.त्यातून उत्तम मार्क्स मिळवून वैद्यकीय शिक्षणाची संधी मिळावी ही विद्यार्थ्यांसह त्यांच्या पालकांची दुर्दैम्य इच्छा.परंतु या नीट परीक्षेतील गोंधळातून भिवंडीतील एका विद्यार्थिनीसह तिच्या पालकांना धक्का बसला असून त्यातून नैराश्यग्रस्त होण्याची वेळ कुटुंबीयांवर आली आहे.



भिवंडीच्या नजीकच्या शेलार ग्राम पंचायत येथे एका यंत्रमाग कंपनीमध्ये काम करून आपल्या मुलांना उच्च शिक्षण मिळवून देण्याची इच्छा मनी बाळगलेले कृष्णा पिनाटे यांची श्वेता ही मुलगी.श्वेता ही वैद्यकीय शिक्षण क्षेत्रात आपलं करिअर करण्याचा निश्चय बाळगलेली एक मुलगी.मागील वर्षी नीट परीक्षा दिली परंतु मार्क्स कमी असल्याने पुन्हा एकदा श्वेता हिने जोरदार अभ्यास करून २०२५ ची नीट परीक्षा दिली.या परीक्षेचा निकाल १४ जून रोजी ऑनलाइन जाहीर झाला या निकाल पत्रात श्वेता हिला ४९२ मार्क्स होते तर ७६३१९ ही ऑल इंडिया रँक होती.तिने निकालाची ऑनलाईन प्रत काढून वैद्यकीय शिक्षणासाठी अर्ज भरण्यास सुरवात केली. रजिस्ट्रेशन केले व त्यानंतर आलेल्या सिलेक्शन यादीत श्वेता हिच्या नावापुढे २७५ गुण व ऑल इंडिया रँकिंग ५१८१८० अशी दाखवण्यात आली.हे पाहताच श्वेता व तिच्या पालकांच्या पायाखालची जमीन हादरली.या नंतर श्वेता हिने सी ई टी सेल येथे चौकशी केली तर ही परीक्षा राष्ट्रीय स्तरावर घेतली जाते त्यांच्याकडे चौकशी व तक्रार करा असा सल्ला दिला.त्यानंतर श्वेता हिने १ नोव्हेंबर रोजी एम सी सी व एन टी ए या संबंधित विभागा सह केंद्रीय आरोग्य शिक्षण मंत्रालयाकडे मेल द्वारा तक्रार केली.पण अजून कोणीही तिच्या तक्रारीचे निवारण केले नाही.

> **मला ४९२ गुण असताना नंतर ते गुण २७५ कसे झाले असा प्रश्न मला पडला असून माझी नक्की कोणती मार्कलिस्ट खरी आहे हेच कळत नसल्याचे सांगत ,यामुळे मी केलेल्या मेहनतीवर नीट परिक्षा मंडळाने पाणी फेरले आहे.मी सतत दोन वर्ष वैद्यकीय प्रवेशासाठी अभ्यास केला पण आज माझ्या हाती निराशा आली असून माझे वडील मध्यमवर्गीय आहेत.लाखो रुपये फी भरून मला वैद्यकीय शिक्षण नाही देऊ शकत तर नीट परीक्षा मंडळाच्या गोंधळामुळे माझ्यासह सर्व कुटुंबीय नैराशेत आले आहे.**
>
> **– विद्यार्थिनी ,श्वेता कृष्णा पिनाटे**

# भूकरमापक पदांसाठी १३ आणि १४ नोव्हेंबर रोजी ऑनलाईन परीक्षा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : भूमि अभिलेख विभागातील गट क पदसमूह ४ (भूकरमापक) संवर्गातील रिक्त पदे भरण्याकरिता १३ आणि १४ नोव्हेंबर २०२५ रोजी ऑनलाईन परीक्षा घेण्यात येणार आहे. या परीक्षेचे विभागनिहाय वेळा-पत्रक आणि उमेदवारांच्या प्रवेशपत्राची लिंक विभागाच्या https:mahabhumi.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे जमाबंदी आयुक्त आणि भूमि अभिलेख संचालक डॉ. सुहास दिवसे यांनी कळविले आहे. भूमि अभिलेख विभागातील उपरोक्त रिक्त पदे सरळसेवेने भरण्याकरीता १ ऑक्टोबर २०२५ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानुसार विहीत कालावधीत ऑनलाइन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची ऑनलाईन परीक्षा घेण्यात येणार आहे. या परीक्षेसाठी १३ नोव्हेंबर रोजी पहिल्या सत्रात पुणे आणि अमरावती विभागात परीक्षा होणार असून या विभागात परीक्षा केंद्र असणाऱ्या उमेदवारांनी परीक्षा केंद्रावर सकाळी ८ वाजता उपस्थित राहावयाचे आहे. तर दुसऱ्या सत्रात नाशिक आणि नागपूर विभागांमध्ये केंद्र असणाऱ्या उमेदवारांनी दुपारी १२ वाजता परीक्षा केंद्रावर उपस्थित राहावयाचे आहे. दिनांक १४ नोव्हेंबर रोजी पहिल्या सत्रात मुंबई (कोकण) विभागात परीक्षा केंद्र असणाऱ्या उमेदवारांनी सकाळी ८ वाजता तर दुसऱ्या सत्रात छत्रपती संभाजीनगर विभागात केंद्र असणाऱ्या उमेदवारांनी दुपारी बारा वाजता परीक्षा केंद्रावर उपस्थित राहावयाचे आहे. या परीक्षा पद्धतीबाबतची सविस्तर माहितीपुस्तिका विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार असल्याचे भूमि अभिलेख कार्यालयामार्फत कळविण्यात आले आहे.

# भिवंडी सरकारी गोडाऊन मधून धान्याचा काळाबाजार उघड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील सरकारी धान्य गोदामातून शहापूर तालुक्यातील अघई गावातील स्वस्त धान्य दुकानाच्या पुरवठ्यासाठी निघा-लेला गहू आणि तांदूळ भरलेला ट्रक नेमून दिलेल्या मार्गाने न जाता, शहापूर शहरा-लगत एका खा-सगी राईसमिलजवळ घुटमळत असल्याचे निर्दशनास आले. यामुळे सरकारी धान्याने भरलेला हा ट्रक शहापूर पोलिसांनी जप्त केला असून, शुक्रवारी (ता. ७) रात्री उशिरा गुन्हा नोंद केला आहे.जप्त केलेल्या ट्रकमध्ये प्रत्येकी ५० किलो वजनाच्या तांदळाच्या ३२० गोणी (सुमारे १६० क्विंटल तांदूळ) आणि सोबत पाच क्विंटल गहू होता. भिवंडीतील सरकारी गोदामातून हा माल अघई गावातील स्वस्तदर धान्य दुकानाच्या पुरवठ्यासाठी निघाला होता. ट्रक नेमून दिलेल्या मार्गावर न जाता, शहापूर शहरालगत वाफे गावाकडे जाणाऱ्या गंगारोड भागातील अर्चना इंग्लिश माध्यमाच्या शाळेसमोर असलेल्या खाजगी राईसमिल समोर दुपारच्या सुमारास आढळून आला. ट्रक चालकाने वाहना-तील सार्वजनिक वितरणाच्या धान्याचा काळाबाजार करण्याच्या उद्देशाने नेमून दिलेल्या मार्गात बदल करून, धान्याचा काळाबाजार करण्याचा प्रयत्न केल्याचे निदर्शनास आले. तालुका पुरवठा अधिकारी यांनी फिर्याद नोंदविल्यानंतर शहापूर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ३६०/२०२५, अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ मधील तरतुदीन-ुसार कलम ३, ७ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी एजाज शहा याला अटक केली आहे. तर

> **शहापूर पोलिसांची कारवाई; तांदळाच्या ३२० गोणी जप्त**

भिवंडी पुरवठा कार्यालयातूनच काळ्याबाजारात जात असल्याने,पुरवठा विभागातील अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले असून, 'काळाबाजाराला वरदहस्त' ठेवल्याचा आरोप नागरिकांम धून होत आहे. रेशन दुकानदार आणि काळ्याबाजारातील एजंटांशी संगनमत करून या गैरव्यवहाराला प्रोत्साहन दिल्याचा आणि वरदहस्त ठेवल्याचा थेट आरोप करण्यात येत आहे. तर ही भिवंडी शासकीय गोदाम मधून आलेली गाडी अग्रवाल व्यापारी याच्या गोडाऊन जवळ आढळली असल्यास एक संशय निर्माण झाला आहे. तर त्या गोडाऊन मालकावरती गुन्हा दाखल करण्यात आला असून गोडाऊनला शील ठोकण्यात आले आहे. या प्रकरणी शहापूर पोलीस अधिक तपास करत आहेत आणि यात मोठे मासे अडकण्याची शक्यता आहे. पुढील तपास आणि प्रशासकीय कारवाई या मोठ्या घोटाळ्याप्रकरणी प्रशासकीय पातळीवर गंभीर दखल घेण्यात आली आहे. तर पुरवठा अधिकारी यांच्यासह या काळ्याबाजारात सहभागी असलेल्या सर्व रेशन दुकानदार आणि एजंट्सवर कठोर कारवाई होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# काकासाहेबनगर महाविद्यालयात आंतर महाविद्यालयीन खो-खो स्पर्धेचे उत्साहात उद्घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : काकासाहेबनगर येथील के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित के. के. वाघ वरिष्ठ महाविद्यालयाच्या भव्य क्रीडांगणावर सावित्रीबाई फ ुले पुणे विद्यापीठांतर्गत आयोजित मुलींच्या आंतरमहाविद्यालयीन खो-खो क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.



के. के. वाघ शिक्षण संस्थेच्या विश्वस्त मा. शकुंतला बाळासाहेब वाघ यांच्या शुभहस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले असून. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालय विकास समितीचे सदस्य रामभाऊ पाटील, रघुनाथ दादा कोल्हे तसेच नाशिक विभागीय क्रीडा समितीचे उपसचिव प्रा. चेतन आव्हाड महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. अतुल गवारे, शरद कदम आदी मान्यवर उपस्थित होते.

या स्पर्धेत सावित्रीबाई फ ुले पुणे विद्यापीठाच्या अंतर्गत असलेल्या नाशिक जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांचे महिला खो-खो संघ त्यांच्या क्रीडा शिक्षकांसह सहभागी झाले आहेत. स्पर्धा संयोजन प्रा बंडू कोल्हे व टीम क्रीडा विभाग, के. के. वाघ काकासाहेबनगर वरिष्ठ महाविद्यालय यांनी स्पर्धा यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

# ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्याकडून अ‍ॅड. कोमल साळुंखे यांच्यावर मोठी जबाबदारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मंगळवेढा : राष्ट्रवादी महिला काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या अत्यंत महत्त्वाच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षा पदावर अ‍ॅड. कोमल अजय साळुंखे (ढोबळे) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाचे सर्वेसर्वा अध्यक्ष शरद पवार यांच्या सुचनेनुसार त्यांना ही जबाबदारी दिली गेली आहे. अ‍ॅड. कोमल साळुंखे यांच्या निवडीमुळे सोलापूर जिल्ह्याला महाराष्ट्र राज्य पातळीवर नेतृत्व लाभल्याने या निवडीचे पक्षा-तील महिला पदाधिकारी, कार्यकर्त्या यांनी स्वागत केले आहे. अ‍ॅड. कोमल साळुंखे या माजी मंत्री लक्ष्मणराव ढोबळे यांच्या कन्या आहेत, बहुजन रयत परिषद संघटनेच्या माध्यमातून त्या राज्यभरात सक्रिय आहेत, सोलापूर जिल्ह्यातही त्यांचा तळागळातील नागरिकांशी चांगला संपर्क आहे, याची दखल घेत शरद पवार यांनी सदर पदावर नियुक्तीचे निर्देश दिले होते, त्यानुसार अध्यक्ष रोहिणी एकनाथ खडसे यांनी अ‍ॅड. कोमल अजय साळुंखे (ढोबळे) यांची नियुक्ती केली आहे. माढा मतदार संघाचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांच्या हस्ते अ‍ॅड. कोमल साळुंखे यांनी नियुक्त पत्र स्विकारले.



मंगळवेढा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरद पवार) पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचा संवाद मेळावा लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात आयोजीत करण्यात आला होता. जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषद निवडणुकीसंदर्भात नियोजनासाठी सदर मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अ‍ॅड. कोमल अजय साळुंखे (ढोबळे) यांना नियुक्ती पत्र देण्यात आले.



अ‍ॅड. कोमल अजय साळुंखे (ढोबळे) म्हणल्या की, ज्येष्ठ नेते शरद पवार साहेब आणि वरिष्ठांच्या विश्वासू नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या म हिला उपप्रादेशाध्यक्ष पदाची जबाबदारी माझ्यावर सोपवली आहे, त्याबद्दल मी आपली सर्वांची आभारी आहे. पक्ष वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली काम करण्याची संधी मिळाली, याचा मला अभिमान आणि गर्व वाटतो. कारण, आमच्या कुटुंबाची राजकीय सुरव-ातच साहेबांच्या सावलीत झाली आहे. आज, ही हा वटवृक्ष सर्वांना आपल्या छायेत सामावून घेत आहे. यामुळेच आज, पक्षाची सेवा करण्याची संधी मिळत आहे. सर्व महिला कार्यकर्त्यांचे, पदाधिकाऱ्यांचे आणि नेत्यांचे मी आभार म ानते, ज्यांनी माझ्यावर विश्वास ठेवला. आपल्या सर्वांच्या सा-थीने आणि समर्थनाने मी या पदाची जबाबदारी पार पाडेन, अशी मी ग्वाही देते, अशी प्रतिक्रिया अ‍ॅड. कोमल साळुंखे यांनी व्यक्त केली.

> **राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षा पदावर नियुक्ती**

यावेळी माजी मंत्री लक्ष्मणराव ढोबळे यांच्यासह जिल्हाध्यक्ष वसंतनाना देशमुख, जिल्हा कार्याध्यक्ष रविंद्र पाटील, भैरवनाथ साखर कारखान्याचे अध्यक्ष अनिल सावंत, रतनचंद शहा बंकेचे राहुल शहा, जिल्हाध्यक्ष ओ.बी.सी. अरूण तोडकर, जिल्हाध्यक्ष युवा सुरज देशमुख, अल्पसंख्यांक सेलचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब शेख, सामाजिक व न्यायचे जिल्हाध्यक्ष धनंजय साठे, सोलापूर जिल्हा महिलाअध्यक्षा सुवर्णा शिवपुरे, जिल्हाध्यक्ष महिला युवती विनंती कुलकर्णी यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या मेळाव्याचे आयोजन मंगळवेढा तालुका व शहर राष्ट्रवादी कांग्रेस पक्ष व सर्व सेल (शरदचंद्र पवार) यांच्यावतीने करण्यात आल्याचे मंगळवेढा तालुकाध्यक्ष पांडुरंग चौगुले, मंगळवेढा शहराध्यक्ष चंद्रशेखर कोंडुभैरी यांनी सांगितले.

**शनिवारवाड्यापासून शिक्षण आयुक्त कार्यालयावर निघणार मोर्चा**

# राज्य शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या न्याय मागण्यांसंदर्भात १७ नोहेबर २५ रोजी महामोर्चा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : राज्यशिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या न्याय मागण्या संदर्भात सतरा नोव्हेंबर २५ रोजी महामोर्चाचे आयोजन शिक्षकेतरांच्या मागण्यांसाठी महामंडळाचे सरकार्यवाह शिवाजी खांडेकर यांचे नेतृत्वात १७ नोव्हेंबर रोजी पुण्यातील ऐतिहासिक शनिवारवाड्यापासून शिक्षण आयुक्त कार्यालयावर मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा नाशिक विभागीय कार्यवाह डी. पी. महाले यांनी दिला आहे.

राज्यातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या मागण्या अनेक वर्षे प्रलंबित असून न्यायालयीन आदेशानुसार सुरु करण्यात आलेली शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदभरती देखील शिक्षण संचालकांनी परिपत्रक काढून बंद केलेली आहे. सदर पदभरती तात्काळ सुरु करण्यात यावी. चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना २४ वर्षानंतर मिळणाऱ्या लाभानुसार त्यांची वेतन निश्चिती करतांना एस ४ मध्ये न करता एस ५ मध्येच करण्यात यावी. शाळातील कर्मचाऱ्यांना माध्यमिक राज्य शासकीय कर्मचाऱ्याप्रमाणे नवीन सुधारित आश्वासित प्रगती योजनेचा १०, २०, ३० वर्षानंतरचा लाभ तात्काळ लागू करण्यात यावा. माध्यमिक शाळांमध्ये शिक्षक पदासाठी पात्र असणारे शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेत-नश्रेणी संरक्षणासह शिक्षक पद-ावर विनाअट पदोन्नती देण्यात यावी. माध्यमिक शाळे-तील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना देण्यात आलेला २४ वर्षाचा दुसरा लाभ हा राज्य शासकीय कर्मचाऱ्याप्रमाणे पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यात यावा. तसेच राज्यातील माध्यमिक शाळांमध्ये चतुर्थश्रेणी कर्मचारी यांची नियुक्ती कंत्राटी पद्धतीने न करता पूर्वीप्रमाणे नियमित वेत-नश्रेणीत करण्यात यावी.

माध्यमिक शाळातील वरिष्ठ लिपीक, मुख्य लिपीक, प्रयोगशाळा सहाय्यक, ग्रंथपाल अतिरिक्त झाल्यास त्यांना सेवानिवृत्त होईपर्यंत वेतनास व वेतनश्रेणीस संरक्षण मि ळावे. प्रयोगशाळा सहाय्यक, ग्रंथपाल, शिपाई यांच्या वेतनातील त्रुटी तात्काळ दूर करण्यात याव्यात. शिक्षकेतर कर्मचारी यांची अर्जित रजा साठवण्याची मर्यादा काढून टाकण्यात यावी अश्या विविध मागण्या संघटनेच्या असुन या मागण्यांसंदर्भात शिक्षकेत्तर महामंडळाचे सरकार्यवाह शिव-ाजीराव खांडेकर राज्य अध्यक्ष अनिल माने राज्य कार्याध्ष वासेकर यांच्या नेतृत्वाखाली मोर्चा काढण्यात येणार आहे. मोर्चामध्ये नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार जिल्ह्यातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन नाशिक विभागीय कार्यवाह डी. पी. महाले यांनी केले आहे.

# सर्वोत्कृष्ट जनसंपर्कासाठी महापारेषणचा जागतिक पातळीवर गौरव; इटलीमध्ये २८ जानेवारीला होणार पुरस्काराचे वितरण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीने (महा-पारेषण) सामाजिक उत्तरदायित्व व प्रभावी जनसंपर्क क्षेत्रात एक नवा आदर्श निर्माण केला आहे. वर्ल्ड इनोव्हेशन अँड चेंज मॅनेजमेंट इन्स्टिट्यूटच्या वतीने महापारेषणला 'पीआरओ पीआर ग्लोब सोशल रिस्पॉन्सिबिलिटी कम्युनिकेशन अचिव्हमेंट अवॉर्ड्स-२०२५' या आंतरराष्ट्रीय पुरस्कारांतर्गत सर्वोत्कृष्ट मानाचा पुरस्कार जाहीर झाला आहे.

या पुरस्काराचे वितरण २८ जानेवारी २०२६ रोजी रोम (इटली) येथे होणाऱ्या पीअ-ारओ पीआर रोमन फोरम या आंतरराष्ट्रीय परिषदेत होणार आहे. या वर्षी सहा खंडांतील एकूण ७६ आंतरराष्ट्रीय परीक्षकांनी विविध संस्थांच्या संवाद, सामाजिक उत्तरदायित्व व जनसंपर्क प्रकल्पांचे मूल्यांकन केले. त्यामध्ये महाप-ारेषणला 'सोशल रिस्पॉन्सिबिलिटी कम्युनिकेशन अचिव्हमेंट' या श्रेणीत जगातील अव्वल तीन संस्थांमध्ये स्थान मिळाले आहे.

या पुरस्कारासाठी कोणतेही शुल्क आकारले जात नाही, ही या पुरस्काराची महत्त्वपूर्ण बाब आहे. हा उपक्रम क्रोएशियातील अप्रिओरी वर्ल्ड एजन्सीद्वारे गेल्या १४ वर्षांपासून आयोजित केला जातो. या एजन्सीला पीआरसीए (पब्लिक रिलेशन्स अँड कम्युनिकेशन्स असोसिएशन), आयपीआरए (इंटरनॅशनल पब्लिक रिलेशन्स असोसिएशन), सीआयपीआर (चार्टर्ड इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक रिलेशन्स) आणि आयसीसीओ (इंटरनॅशनल कम्युनिकेशन्स कन्सल्टन्सी ऑर्गनायझेशन) या चार प्रमुख जागतिक जनसंपर्क संघटनांचे सहकार्य लाभले आहे.

सामाजिक, पर्यावरणीय आणि संवाद क्षेत्रातील सकारात्मक, पारदर्शक आणि नवोन्मेषी उपक्रम ांची जागतिक पातळीवर नोंद घेणे आणि त्यांना प्रोत्साहन देणे, हा या पुरस्काराचा हेतू आहे. म हापारेषणच्या या आंतरराष्ट्रीय सन्म ानामुळे महाराष्ट्रातील सार्वजनिक क्षेत्रातील संवाद, सामाजिक जबाबदारी आणि प्रभावी जनसंपर्काची दखल जागतिक स्तरावर घेतली गेली आहे. हा पुरस्कार कंपनीच्या नवोन्मेषी दृष्टीकोनाचे आणि कार्यसंघाच्या संयुक्त प्रयत्नांचे प्रतीक आहे.